# १३.
# वैरण विकास

# १३. वैरण विकास विभाग

पशुधन संगोपनात पशुधनाची शारीरिक वाढ, प्रजोत्पादन, दुग्धउत्पादन व आरोग्य संवर्धन तसेच पशुधनापासून अपेक्षित लाभ व पशुसंगोपन, दुग्धव्यवसाय आर्थिकदृष्ट्या किफायतशीर वर्धनक्षम होण्यासाठी सकस हिरव्या व वाळलेल्या वैरणीची आवश्यकता असून यासाठी सुधारित, संकरित व अधिक उत्पादन देणाऱ्या बहुवर्षीय एकदल/व्दिदल वैरण प्रजातींची लागवड करून वैरण उत्पादन वाढविणे व कमी खर्चात पशुधनासाठी प्रथिनयुक्त व सकस आहार उपलब्ध करण्यासाठी वैरण विकास घटक महत्त्वाचा, असून वैरण विकासाच्या विविध योजना अमलबजावणी करून पशुपालकांना आहाराचे महत्त्व पटवून, तसेच विविध सुधारित संकरित बहुवर्षीय एकदल/व्दिदल वैरण प्रजातींची लागवड व प्रसार करणे विविध विकासाच्या योजनां राबविण्यात येत आहेत.

सदरबाब विचारात घेवून, पशुसंवर्धन विभागात सन १९५८-५९ वर्षात आधारभूत ग्रामकेंद्रातंर्गत वैरण विकास शाखेचे काम सुरू करण्यात आले. सन १९६५-६६ या वर्षापासून सघन पशुसुधार प्रकल्पात वैरण विकास कार्यक्रमाचा अंर्तभाव करण्यात आला.

सन २००७ च्या पशुगणनेनुसार राज्यातील २३८.७२ लक्ष पशुधन घटकासाठी हिरवी व वाळलेली वैरण व पशुखाद्य याबाबतची आवश्यकता, उपलब्धता व कमतरता याबाबतची स्थिती खालील प्रमाणे.

| अ. क्र. | प्रकार | आवश्यकता लक्ष मे. टन | उपलब्धता लक्ष मे. टन | कमतरता लक्ष मे. टन | कमतरतेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | हिरवी वैरण | ४३० | १०३ | ३२७ | ७६.०४ |
| २ | वाळलेली वैरण | ५९८ | ४०५ | १९३ | ३२.२७ |
| ३ | पशुखाद्य | १३१ | ७५ | ५६ | ४२.७४ |

वरील बाबीच्या अनुषंगाने वैरण विकास शाखेकडून खालीलप्रमाणे कामकाज केले जाते.

१. केंद्र पुरस्कृत वैरण लघुप्रात्येक्षिक योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर सुधारित वैरण पिके लागवडीसाठी बियाणांचे वाटप करणे व या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

२. कृषि, वन विभाग, सामाजिक वनिकरण, फलोत्पादन या विभागांशी समन्वय साधून राज्यातील पडीक व इतर क्षेत्र विकास आराखडा तयार करणे.

३. विविध वैरण विकास योजनांसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधी खर्चाबाबतचे सनियंत्रण करणे.राज्यातील सध्याची व भविष्यातील पशुधन संख्येच्या आधारावर वैरण व पशुखाद्यांची उपलब्धता व गरज याबाबत माहिती प्राप्त करून वैरण उपलब्धतेसाठी विविध वैरण विकास योजनांचे नियोजन व अमंलबजावणी करणे.

४. राज्यातील वैरणीच्या आवश्यकतेनुसार नवीन संकरित वैरण, पिके घेण्याची शक्यता पडताळून प्रस्ताव सादर करणे.

५. वैरण विकास विस्तार कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांचे/शेतकऱ्यांचे राज्यस्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून, वैरण विकास विषयक आवश्यक तंत्रज्ञानाची माहिती देणे.

६. आकाशवाणी व दूरदर्शन या माध्यमाव्दारे वैरण विकास कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देणे.

७. दुष्काळ सदृष्य परिस्थिती, अतिवृष्टी, महापूर, भुकंप इत्यादी नैसर्गिक आपत्ती विचारात घेवून, महसुल व वन विभागाच्या मदतीने पशुधनास वैरण खाद्य, सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करणे तसेच जनावरांच्या छावण्या व चारा डेपो उघडण्याबाबत नियोजन करणे.

८. केंद्र आणि राज्य शासनास आवश्यकतेनुसार नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ सदृष्य परिस्थितीबाबत अहवाल सादर करणे.

९. पशुपक्षी खाद्य निर्मितीकरिता भारतीय अन्नमहामंडळ यांचेकडील अखाद्य धान्य पशुखाद्य उत्पादनाकरिता कच्चे घटक उपयोगात आणण्याकरिता पशुखाद्य उत्पादक संस्थाना नोंदणीकरिता शिफारस पत्र देणे. तसेच अन्न महामंडळाकडील अखाद्य धान्याच्या लिलावाबाबत पशुखाद्य संस्थाना माहिती अवगत करणे.

१०. पशुखाद्य निर्मितीसाठी मळीचा कोटा उपलब्धतेबाबत शिफारशी करणे.

११. पशुसंवर्धन विभाग तसेच शासकीय/निमशासकीय प्रक्षेत्रावरील जनावरांसाठी, कुक्कुट पक्षांसाठी पशुपक्षी खाद्याचा दर करार करणे.

१२. राज्यात विविध योजनांतर्गत आवश्यक विविध वैरण बियाणे खरेदीकरिता वाटप करण्यात येणाया बी-बियाण्याचा दर करार करणे.

**वैरण विकास शाखेकडून खालील योजना राबविण्यात येतात.**

**१. केंद्र पुरस्कृत योजना .-**

**१) वैरणीच्या विटा तयार करणे :-** ५० टक्के केंद्र हिस्सा व ५० टक्के राज्य हिस्सा अनुदान योजना असून एकूण प्रकल्प उभारणीसाठी रुपये ८५ लाख अनुदान अनुज्ञेय आहे.

*ℐ* पीक काढणीनंतर वाया जाणारे पिकांचे अवशेष वाया न घालवता त्याचा जनावरांसाठी वैरणीच्या विटा तयार करण्यासाठी उपयोग करणे, जनावरांसाठी टंचाई, अतिवृष्टी, पुरपरिस्थितीच्या काळात पोषणयुक्त खाद्य उपलब्ध करणे ही या योजनेची उद्दिष्ट्ये आहेत.

**२) गवतक्षेत्र विकास व साठा :-** (Grassland Development Including Grass Reserves) हलक्या/पडीक जमिनी विकसीत करुन, त्यावर योग्य प्रकारचे एकदल/व्दिदल गवत प्रजाती व वैरणदेय वनस्पती/वृक्ष (फॉडर ट्री) यांची लागवड करून, जमिनीची अतिरिक्त धूप थांबविणे, जनावराच्या पोषणासाठी वैरणीचे उत्पादन करणे, उत्पादित वैरणीचा राखीव साठा, वैरणीचे संचय स्वरुपात जतन करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

*ℐ* या कार्यक्रमांतर्गत जमिनीची प्रतवारी निश्चित करून, कृषी हवामान प्रभागानुसार योग्य, गवत प्रजातींची लागवड करणे, जेणेकरून सदर जमिनीची धूप थांबविण्या बरोबरच सुपीकता वाढविण्यास मदत होईल.या कार्यक्रमांतर्गत एका यूनिटसाठी ५ ते १० हेक्टर एवढे क्षेत्र वैरण विकासासाठी उपयोगात आणण्यात येते. या अंतर्गत सामाईक/वरकस जमिनी/गायरान/पडीक जमिनी/ शासकीय प्रक्षेत्राच्या जमिनी/गोशाळांच्या जमिनी/वनक्षेत्रातील जमिनी आणि शेतकऱ्यांच्या वैयक्तीक जमिनीवर, सदर कार्यक्रम राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमांतर्गत १० हेक्टरच्या एका युनिटकरिता केंद्र शासनाचे १०० टक्के अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच जमिनीच्या उपलब्धतेनुसार रूपये १.५० लक्ष ते रूपये १०.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे.

**३) वैरण बियाणे प्रापण/संकलन आणि वितरण** (Fodder Seed Procurement and Distribution) :- राज्यात उत्तम दर्जाचे ब्रिडर वैरण बियाणे, पायाभूत बियाणे आणि प्रमाणित बियाणे यांचे उत्पादन वाढवून उत्पादित बियाणांना खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध करून देणे, आणि शेतकऱ्यांना वैरण उत्पादनासाठी दर्जेदार प्रमाणित वैरण बियाणे वाटप करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.या कार्यक्रमाकरिता शासकीय यंत्रणा/शासन अंगीकृत उपक्रमांना केंद्र शासनाचे ७५ टक्के अनुदान व राज्य शासनाचे २५ टक्के अनुदान अनुज्ञेय आहे.

**४) खाद्य विश्लेषण प्रयोगशाळांचे बळकटीकरण :-** राज्यात पशु व कुक्कुट खाद्याचा तसेच या खाद्याच्या निर्मीतीसाठी लागणाऱ्या खाद्य घटकांचा दर्जा, विहित मानकांनुसार व उच्च प्रतीचा राखण्यासाठी, उच्च दर्जाचे खाद्य उत्पादन वाढविणे व उपलब्ध करुन देणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील पशुसंवर्धन विभागाची खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांचे अधिनस्त कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातील खाद्य विश्लेषण प्रयोगशाळा तसेच कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत खाद्य विश्लेषण प्रयोगशाळांमध्ये, खाद्य नमुन्यांचे पृथःकरण करणेसाठी आवश्यक असलेली आधुनिक यंत्रसामुग्री व उपकरणे खरेदी करण्यासाठी अनुदान उपलब्ध करण्यात येते. याकरिता केंद्र शासनाचे ५० टक्के अनुदान अनुज्ञेय असून उर्वरित ५० टक्के खर्च संबंधित यंत्रणेव्दारे करणे अपेक्षित आहे. एका खाद्य विश्लेषण प्रयोगशाळेकरिता केंद्र शासनाच्या अनुदानाची अनुज्ञेय कमाल मर्यादा रुपये १००.०० लक्ष (रुपये शंभर लक्ष) किंवा एकूण प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.

**४) (अ) हस्तचलीत कडबाकुट्टी यंत्राच्या वापरास प्रोत्साहन देणे** (Introduction of Hand Driven Chaff cutter) :- राज्यात उत्पादित होणाऱ्या वैरणीचा पुरेपुर वापर व्हावा व वैरण वाया जाण्याचे प्रमाण कमी व्हावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. एका हस्तचलीत कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी रुपये ५०००/- (रुपये पाच हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाच्या ७५ टक्के अथवा कडबाकुट्टी यंत्राच्या प्रत्यक्ष खरेदी किमतीच्या ७५ टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल, तेवढे केंद्र शासनाचे अनुदान या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय आहे.

**४) (ब) विद्युतचलीत कडबाकुटी यंत्राच्या वापरास प्रोत्साहन देणे** (Introduction of Power Driven Chaff cutter) :- राज्यात उत्पादीत होणाऱ्या वैरणीचा पुरेपुर वापर व्हावा व वैरण वाया जाण्याचे प्रमाण कमी व्हावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. एका विद्युतचलीत कडबाकुट्टी यंत्र खरेदीसाठी रुपये २००००/- (रुपये वीस हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाच्या ७५ टक्के अथवा कडबाकुट्टी यंत्राच्या प्रत्यक्ष खरेदी किमतीच्या ७५ टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल, तेवढे केंद्र शासनाचे अनुदान या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय आहे.

**५. मुरघास तयार करण्याच्या यूनिटची स्थापना करणेसाठी अर्थसहाय्य** (Assistance for Establishment of Silage making Units) :- अतिरिक्त उत्पादित हिरव्या वैरणीचे मुरघास तयार करून, त्याचा चारा टंचाईच्या काळात पशुधनास पोषणमूल्य वैरण उपलब्ध करून देणे, हा योजनेचा उद्देश आहे.

या योजनेसाठी मुरघास तयार करण्यासाठी चर पध्दत अवलंबविणे अपेक्षित आहे. यासाठी चर (Trench Silo pit) तयार करण्याकरिता बांधकामासाठी रुपये ७५,०००/- (रुपये पंच्च्याहत्तर हजार फक्त). त्याचप्रमाणे विद्युतचलीत कडबाकुट्टी यंत्र खरेदी करण्यासाठी रुपये ३०,०००/- (रुपये तीस हजार फक्त) च्या मर्यादेत केंद्र शासनाचे १०० टक्के अनुदान अनुज्ञेय आहे..

**५) (अ) अझोला उत्पादन प्रात्यक्षिक केंद्राची स्थापना करण्यासाठी अर्थसहाय्य** (Assistance for Demonstration Azolla cultivation and production Units) :- हिरव्या वैरणीला पर्याय म्हणून अझोला या शेवाळ वनस्पतीचे उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन देणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

या कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या शेतकऱ्यांना, सहकारी दूध संघाचे सदस्यांना अझेला उत्पादनाचे प्रशिक्षण देऊन, अझोला कल्चर उपलब्ध करून देण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत अझोला कल्चर पुरवठा आणि प्रशिक्षण या दोन्ही बाबींसाठी प्रती लाभार्थी/ यंत्रणा एकूण अंदाजित खर्च जास्तीत जास्त रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) याच्या ५० टक्के अथवा येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के (दोन्हीपैकी जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेत) केंद्र शासनाचे अनुदान अनुज्ञेय आहे..

**६) बायपास प्रोटीन उत्पादन केंद्रांच्या स्थापनेकरिता अर्थसहाय्य** (Assistance for Establishment of By-Pass Protein Production Units) :- उच्च दुग्ध उत्पादन करणाऱ्या दुधाळ गायी म्हशींच्या पोषणासाठी उत्तम दर्जाचे खाद्य घटक वापरून या खाद्याचे पोषणमूल्य वाढविण्याबरोबरच ते पशुधनाच्या आहारासाठी पुरेपुर उपयोगात आणणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत दूध महासंघ, खाजगी उद्योजक यांना प्रती दिन ५० मेट्रीक टन उत्पादन क्षमतेचे, बायपास प्रोटीन उत्पादन केंद्राची स्थापना करण्यासाठी केंद्र शासनाचे अर्थसहाय्य अनुदेय आहे. सदर युनिटची उभारणी करण्यासाठी रुपये १४५.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर यूनिटची स्थापना करण्यासाठी लागणारी संयंत्रे व यंत्रसामुग्री यांच्या खरेदीसाठी रुपये ३६.२५ लक्ष किंवा प्रत्यक्ष खरेदी खर्चाच्या २५ टक्के यापैकी जी रक्कम कमी असेल, त्या मर्यादेत केंद्र शासनाचे अनुदान अनुज्ञेय राहील. संस्था/उद्योजकाला प्रकल्प उभारणीसाठीचा उर्वरित खर्च बँकेच्या कर्जाव्दारे उपलब्ध करावा लागेल. या कार्यक्रमाखाली संस्था/ उद्योजकांचे राष्ट्रीयकृत/व्यापारी बँक/नाबार्ड यांचेकडून प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेबाबत आणि वर्धनक्षमतेबाबत प्रमाणित केलेले प्रस्ताव विचारात घेतले जातात.

**७. क्षेत्रनिहाय विवक्षित भागात क्षार मिश्रण, पशुखाद्य कांडी व पशुखाद्य निर्मिती केंद्राच्या स्थापनेकरिता अर्थसहाय्य** (Assistance for Establishment of Area specific Mineral Mixture/Feed Pelleting/Feed Manufacturing Unit) :- पशुखाद्य व विवक्षित भागातील क्षारांच्या कमतरतेनुसार, त्या भागात आवश्यक घटक द्रव्यांसह क्षार मिश्रणाची उपलब्धता वाढवून त्याव्दारे पशुधनाच्या आरोग्यात सुधारणा व उत्पादन क्षमतेत वाढ करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमाखाली, सार्वजनिक उपक्रम, खाजगी उद्योजक यांना क्षार मिश्रण, पशुखाद्य कांडी व पशुखाद्य निर्मिती केंद्राच्या स्थापनेकरिता अर्थसहाय्य देय आहे. या अंतर्गत केंद्र शासनाचे २५ टक्के अनुदान प्रति केंद्र रुपये २५.०० लक्ष किंवा प्रत्यक्ष संयंत्र उभारणीच्या खर्चाच्या २५ टक्के रक्कम, या दोन्हीपैकी जी रक्कम कमी असेल, त्या मर्यादेत देय राहील. या कार्यक्रमाखाली संस्था/उद्योजकांना केंद्रीय अर्थसहाय्याचा लाभ घेण्यासाठी उर्वरित रक्कम बँकेचे कर्ज घेवून उभारावी लागेल. तसेच राष्ट्रीयकृत बँक/नाबार्ड यांचेकडून प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेबाबत आणि वर्धनक्षमतेबाबत प्रमाणित केलेले प्रस्ताव विचारात घेतले जातात. या कार्यक्रमाखाली लघु उत्पादन क्षमतेचे प्रकल्प प्रस्ताव देखील विचारात घेतले जातील.

**२. लघुप्रात्यक्षिक योजना .-**

केंद्र शासनामार्फत या योजनेसाठी १०० टक्के अनुदानावर विविध वैरण पिकांच्या सुधारित प्रजातीचे वैरण बियाणे उपलब्ध होते.

**योजनेसाठी लाभार्थी निवडीचे निकष खालीलप्रमाणे :--**

१) प्रति लाभार्थीस ०.१० हेक्टर क्षेत्राकरिता आवश्यक विविध वैरण पिकांच्या सुधारित प्रजातीचे वैरण बियाणे १०० टक्के अनुदानावर पुरविण्यात येते.

२) २५% लघुप्रात्यक्षिकाचे बियाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना पुरविण्यात येते.

३) या योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या पीकासाठी खतावरील खर्च संबंधित लाभार्थीनी करावयाचा आहे

४) या योजनेमध्ये यापुर्वी लाभ न घेतलेल्या शेतकऱ्यांस प्राधन्याने लाभ देण्यात येतो.

५) या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे कार्यालयातील वैरण विकास अधिकारी शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करतात.

**३. योजनेत्तर योजना .-**

जिल्हा परिषदेमार्फत १०० टक्के अनुदानावर वैरण पिकांच्या **सुधारित जातीच्या वैरण बियाण्याचे व ठोंबाचे वाटप** करण्यात येते. सदर योजना खालील मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येते.

१) योजनेमध्ये लाभार्थीची निवड करताना योजनेच्या उद्देशाप्रमाणे लाभार्थीची निवड करण्यात येते उदा. सर्व साधारण आदिवासी क्षेत्रासाठी योजना असेल तर आदिवासी क्षेत्रातीलच आदिवासी शेतकऱ्यांची निवड करावी. आदीवासी क्षेत्राबाहेरील परंतू आदिवासीकरिता योजना असेल तर त्याप्रमाणे आदिवासीची निवड करावी सर्वसाधारण शेतकऱ्यांसाठी योजना असेल तर त्यामध्ये अल्प अत्यल्प जमीनधारक शेतकऱ्यांचाही समावेश करण्यात येतो.

२) ज्या लाभार्थीकडे स्वतःची जनावरे आहेत अशाच लाभार्थीची निवड केली जाते. लाभार्थीकडील पशुधनामध्ये एकातरी दुभत्या गायी/म्हशींचा समावेश असल्यास अशा लाभार्थीस प्राधान्य दिले जाते.

३) योजनेसाठी वैरण बियाणाचे वाटप करताना लाभार्थीकडे वैरण उत्पादनासाठी स्वतःची शेत जमीन असणे आवश्यक आहे. सिंचन सुविधा उपलब्ध असणाऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांना एनबी-२१, बरसीम, ल्युसर्न, यशवंत, जयवंत इत्यादी बागायती पिकांचे बियाणे/ठोंबाचा प्राधान्याने पुरवठा करण्यात येतो.

४) यशवंत गवताची लागवड ३× ३ फुट (९० × ९० सें.मी.) अतंरावर कर. याकरिता हेक्टरी २५००० ठोंबाची आवश्यकता असते, तर प्रति एकरी १०,००० ठोंबे पूरेशी होतात. यशवंत गवताची ठोंबे, संशोधन अधिकारी, गवत संशोधन योजना व विभाग प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर तसेच कृषि संशोधन केंद्र, पालघर, जिल्हा ठाणे यांचेकडे प्रति नग रूपये १/- या दराने उपलब्ध आहेत. यशवंत गवतापासून प्रति हेक्टरी २०० ते २५० टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते. यामध्ये १०.५७ टक्के प्रथिनाचे प्रमाण असून ते गजराज (९.४ टक्के) पेक्षा जास्त आहे. यशवंत गवताच्या चाऱ्याची पचनीयता ६३.६५ टक्के आहे.

५) फुले जयवंत गवताची लागवड ३×२ फुट (९० ६० सें.मी.) अतंरावर करण्यात येते. याकरिता हेक्टरी ३७००० ठोंबाची आवश्यकता असते, तर प्रति एकरी १४,८०० ठोंबे पुरेशी होतात.फुले जयवंत गवताची ठोंबे, कृषि संशोधन केंद्र पालघर, जिल्हा ठाणे (कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत) व गो संशोधन व विकास प्रकल्प, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर येथे प्रति नग रुपये १/- या दराने उपलब्ध आहेत. फुले जयवंत गवतापासून प्रति हेक्टरी २५० ते ३०० टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते. यात १०.३५ टक्के प्रथिनाचे प्रमाण असून ते गजराज (९.४ टक्के) पेक्षा जास्त आहे. फुले जयवंत गवताच्या चाऱ्याची पचनीयता ६१.८ टक्के आहे.

६) पिकाकरिता आवश्यक खते जिवाणू संवर्धने लाभार्थीने स्वतःच्या खर्चाने घेणे अपेक्षित आहे.

७) प्रत्येक लाभार्थीना ०.१० ते ०.४० हेक्टर क्षेत्र मर्यादेत वैरण बियाणे/ठोंब प्रती एकर रूपये ६००/- च्या मर्यादेपर्यत १०० टक्के अनुदानावर वस्तूरूपात पुरवठा करण्यात येतो.

८) वर्षात एका लाभार्थीला एकदाच अनुदानाचा लाभ देण्यात येतो.

९) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे कार्यालयाती वैरण विकास अधिकारी यांचे मार्गदर्शन घेऊन योजना राबविण्यात येते.

♦♦♦